0 9 JUN 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महामानवांच्या विचारांचा अभ्यास व्हावा

## पालकमंत्री आबिटकर : विद्यापीठात शरण साहित्य अध्यासन इमारतीचे लोकार्पण

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शरण साहित्य अध्यासनाच्या इमारतीच्या लोकार्पणप्रसंगी पालकमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील, कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आदी.

### विद्यापीठ प्रयत्नशील

शरण साहित्यामधील समता आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील राहील, असे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले.

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अध्यासनांची उभारणी आणि विस्तारासाठी शासन सर्वोतोपरी सहकार्य करण्याच्या भूमिकेत आहे. त्यामुळे महामानवांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने तेथे त्यांच्या विचारकार्याचा नियोजनबद्ध अभ्यास व संशोधन व्हावे, अशी अपेक्षा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज व्यक्त केली.

विद्यापीठात जिल्हा नियोजन व विकास समितीच्या आर्थिक सहकार्यातून बांधलेल्या शरण साहित्य अध्यासनाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण मंत्री आबिटकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील, कुलगुरू डॉ. आर. के. कामत उपस्थित होते.

मंत्री आबिटकर म्हणाले, 'शरण साहित्य अध्यासन इमारतीच्या पुढील टप्प्याला गतिमानता देण्यासाठी प्रयत्न केले जातील. महात्मा बसवेश्वरांचे उत्तुंग कार्य आणि प्रेरक विचार यांचा सर्वदूर प्रसार होण्याच्या दृष्टीने प्रयत्नांची गरज आहे.'

मंत्री मुश्रीफ म्हणाले, 'महात्मा बसवेश्वर हे युगप्रवर्तक क्रांतिकारक होते. नितीमूल्यांवर चालणारा समाज त्यांना अभिप्रेत होता. त्यासाठी त्यांनी त्याग केला. त्यांचे जीवनचरित्र आणि कार्य यांच्यावर संशोधनकार्य व्हावे.

आमदार सतेज पाटील यांनी बसवेश्वरांचे विचार जागतिक पातळीवर नेण्यासाठी या अध्यासनाच्या दुसऱ्या टप्प्याला गती देण्यासाठी शासनाने सहकार्य करावे.

अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, सूर्यकांत पाटील-बुदिहाळकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. अजितसिंह जाधव, राजाराम गुरव, चन्नबसवानंद स्वामी, डॉ. रघुनाथ धमकले, रजनीताई मगदूम, जी. पी. माळी, सरलाताई पाटील, गिरीष कुलकर्णी, सतीश घाळी, चंद्रशेखर डोल्ली, विश्वनाथ मगदूम, राजू दड्डी, बसवराज आजरी, राहुल नष्टे, विलास आंबोळे, चंद्रशेखर बटकडली, बाबूराव तारळी, राजशेखर तंबाके, अनिल सोलापुरे, राजेश पाटील-चंदूरकर, सुरेश हुपरे, मल्लाप्पा चौगुले, जीवन बोडके, रणजित यादव उपस्थित होते. यश आंबोळे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 9 JUN 2026
लोकमत

# महामानवांच्या कार्याचे नियोजनबद्ध संशोधन व्हावे

## प्रकाश आबिटकर : शरण साहित्य अध्यासनाच्या इमारतीचे लोकार्पण

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठाच्या शरण साहित्य अध्यासनाच्या इमारतीच्या लोकार्पणप्रसंगी मंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील, कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होते.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अध्यासनांची उभारणी आणि विस्तार यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करण्याच्या भूमिकेत आहे. त्यामुळे महामानवांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने तेथे त्यांच्या विचारकार्याचा नियोजनबद्ध अभ्यास आणि संशोधन व्हावे, अशी अपेक्षा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सोमवारी व्यक्त केली.

विद्यापीठामध्ये कोल्हापूर जिल्हा नियोजन व विकास समितीच्या आर्थिक सहकार्यातून बांधण्यात आलेल्या शरण साहित्य अध्यासनाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण आणि उद्घाटन मंत्री आबिटकर यांच्या हस्ते झाले. वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

मंत्री मुश्रीफ म्हणाले, महात्मा बसवेश्वर हे युगप्रवर्तक क्रांतिकारक होते. त्यांचे जीवनचरित्र आणि कार्य यांच्यावर विद्यापीठात मोठे संशोधनकार्य व्हावे व त्याला सामाजिक पाठबळ लाभावे.

आमदार सतेज पाटील यांनी बसवेश्वरांचे विचार जागतिक पातळीवर नेण्यासाठी अध्यासनाच्या दुसऱ्या टप्प्याला शासनाने सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी मनोगत व्यक्त केले. यश आंबोळे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, ॲड. अभिषेक मिठारी, सुर्यकांत पाटील-बुद्ध्याळकर, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. अजितसिंह जाधव, रजनी मगदूम, डॉ. जी. पी. माळी, सरलाताई पाटील, राजशेखर तंबाखे, अमरदीप पाटील, चन्नबसवानंद स्वामी उपस्थित होते.

0 9 JUN 2026

पुण्यनगरी



# महामानवांच्या विचारकार्याचे संशोधन व्हावे : आबिटकर

## विद्यापीठात शरण साहित्य अध्यासनाच्या इमारतीचे लोकार्पण

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अध्यासनांची उभारणी आणि विस्तार यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करण्याच्या भूमिकेत आहे. त्यामुळे महामानवांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने तेथे त्यांच्या विचारकार्याचा नियोजनबद्ध अभ्यास आणि संशोधन व्हावे, अशी अपेक्षा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठामध्ये जिल्हा नियोजन व विकास समितीच्या आर्थिक सहकार्यातून बांधण्यात आलेल्या शरण साहित्य अध्यासनाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण आणि उद्घाटन मंत्री आबिटकर यांच्या हस्ते सोमवारी झाले, त्यावेळी ते बोलत होते. वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ आणि विधान परिषद सदस्य आ. सतेज पाटील यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती.

मंत्री आबिटकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठामध्ये शरण अध्यासनाच्या बरोबरीनेच महावीर अध्यासन, लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन आणि कै. डॉ. ग. गो. जाधव अध्यासन इत्यादी कार्यरत असून, त्यांनाही शासनाच्या माध्यमातून वेळोवेळी आर्थिक सहकार्य करण्याची भूमिका राहिलेली आहे. शरण साहित्य अध्यासन इमारतीच्या पुढील टप्प्याला गतिमानता देण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले जातील.

मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, महात्मा बसवेश्वर हे युगप्रवर्तक क्रांतिकारक होते. नीतिमूल्यांवर चालणारा समाज त्यांना अभिप्रेत होता. त्यासाठी त्यांनी मोठा त्याग केला. त्यांचे जीवनचरित्र आणि कार्य यांच्यावर विद्यापीठात मोठे संशोधनकार्य व्हावे आणि त्याला भरीव सामाजिक पाठबळ लाभावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या वेळी आ. सतेज पाटील यांनी बसवेश्वरांचे विचार जागतिक पातळीवर नेण्यासाठी या अध्यासनाच्या दुसऱ्या टप्प्याला गती देण्यासाठी शासनाने सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी शरण साहित्यामधील समता आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील राहील, याची ग्वाही दिली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मंत्री आबिटकर आणि मुश्रीफ यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण आणि फीत कापून इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, सूर्यकांत पाटील-बुद्धिहाळकर यांनी मनोगत व्यक्त केले. यश आंबोळे यांनी सूत्रसंचालन, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

या वेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, चन्नबसवानंद स्वामीजी, डॉ. रघुनाथ धमकले, रजनीताई मगदूम, डॉ. जी. पी. माळी, सरलाताई पाटील, डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ. सतीश घाळी, चंद्रशेखर डोल्ली, डॉ. विश्वनाथ मगदूम, राजू दड्डी, बसवराज आजरी, राहुल नष्टे, विलास आंबोळे, चंद्रशेखर बटकडली, बाबूराव तारळी, राजशेखर तंबाके, अनिल सोलापुरे, राजेश पाटील-चंदूरकर, सुरेश हुपरे, मल्लाप्पा चौगुले, वास्तुविशारद जीवन बोडके, अभियंता रणजित यादव आदी मान्यवर उपस्थित होते.

0 9 JUN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महामानवांच्या विचारकार्याचे संशोधन व्हावे

## मंत्री प्रकाश आबिटकर : शिवाजी विद्यापीठात शरण साहित्य अध्यासनाच्या इमारतीचे लोकार्पण

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अध्यासनांची उभारणी आणि विस्तार यासाठी शासन सर्वोतोपरी सहकार्य करण्याच्या भूमिकेत आहे. त्यामुळे महामानवांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने तेथे त्यांच्या विचारकार्याचा नियोजनबद्ध अभ्यास आणि संशोधन व्हावे, अशी अपेक्षा महाराष्ट्राचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठामध्ये जिल्हा नियोजन व विकास समितीच्या आर्थिक सहकार्यातून बांधलेल्या शरण साहित्य अध्यासनाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण आणि उद्घाटन मंत्री आबिटकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि विधानपरिषद सदस्य सतेज पाटील यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, महात्मा बसवेश्वर जीवनचरित्र आणि कार्य यांच्यावर विद्यापीठात मोठे संशोधनकार्य व्हावे आणि त्याला भरीव सामाजिक पाठबळ लाभावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी आमदार सतेज पाटील यांनी बसवेश्वरांचे विचार जागतिक पातळीवर नेण्यासाठी या अध्यासनाच्या दुसऱ्या टप्प्याला गती देण्यासाठी शासनाने सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी शरण साहित्यामधील समता आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील राहील, याची ग्वाही दिली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मंत्री आबिटकर आणि मुश्रीफ यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण आणि फीत सोडवून इमारतीचे उद्घाटन केले. अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, सूर्यकांत पाटील-बुद्ध्याळकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी यश आंबोळे यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह अध्यासनाच्या समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, चन्नबसवानंद स्वामीजी, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ धमकले, रजनीताई मगदूम, डॉ. जी. पी. माळी, सरलाताई पाटील, डॉ. गिरीष कुलकर्णी, डॉ. सतीश घाळी, चंद्रशेखर डोल्ली, डॉ. विश्वनाथ मगदूम, राजू दड्डी, बसवराज आजरी, राहुल नष्टे, विलास आंबोळे, चंद्रशेखर बटकडली, बाबूराव तारळी, राजशेखर तंबाके, अनिल सोलापुरे, राजेश पाटील-चंदूरकर, सुरेश हुपरे, मल्लाप्पा चौगुले, वास्तुविशारद जीवन बोडके, अभियंता रणजित यादव यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शरण साहित्य अध्यासनाच्या इमारतीच्या लोकार्पण व उद्घाटन प्रसंगी मंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील, कुलगुरू डॉ. रजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह उपस्थित अधिकारी आणि मान्यवर.

### बसवेश्वरांचे उत्तुंग कार्य सर्वदूर प्रसारसाठी सार्वत्रिक प्रयत्नांची गरज

मंत्री आबिटकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठामध्ये शरण अध्यासनाच्या बरोबरीनेच महावीर अध्यासन, लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन आणि कै. डॉ. ग. गो. जाधव अध्यासन इत्यादी कार्यरत असून त्यांनाही शासनाच्या माध्यमातून वेळोवेळी आर्थिक सहकार्य करण्याची भूमिका राहिलेली आहे. शरण साहित्य अध्यासन इमारतीच्या पुढील टप्प्याला गतिमानता देण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले जातील. महात्मा बसवेश्वरांचे उत्तुंग कार्य आणि प्रेरक विचार यांचा सर्वदूर प्रसार होण्याच्या दृष्टीने सार्वत्रिक प्रयत्नांची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

09 JUN 2026

जनप्रवास



# विद्यापीठाच्या वैष्णवी रावळची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**जनप्रवास : कोल्हापूर**

चीन येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झालेली शिवाजी विद्यापीठाची खेळाडू वैष्णवी राजेंद्र रावळ हिचा कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

९ ते १२ जुलै २०२६ दरम्यान होणाऱ्या चीनमध्ये २३ वर्षाखालील ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये भारतीय संघात शिवाजी विद्यापीठाची खेळाडू वैष्णवी राजेंद्र रावळ (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज) हिची भारतीय संघात निवड झाली आहे. वैष्णवीचा संपूर्ण सराव शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर झाला आहे.

गतवर्षी तिने विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले आहे. शिवाजी विद्यापीठाने या वर्षी वैष्णवीला स्पोर्ट्स स्कॉलरशिपही दिली आहे. तिच्या या निवडीबद्दल कुलगुरू डॉ.राजनीश कामत यांच्या हस्ते तसेच प्र - कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, सचिव डॉ. अनिल कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम, डॉ. राहुल मगदूम यांच्या उपस्थितीत सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. वैष्णवी आता आंतरराष्ट्रीय सराव शिबिराकरिता बंगळुरूला रवाना होणार आहे.

0 9 JUN 2026

सकाळ



कोल्हापूर : नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांचे स्वागत विद्यापीठ विकास आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांनी केले. यावेळी उपस्थित डॉ. ज्योती जाधव, डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह आघाडीतील अन्य पदाधिकारी.

# विद्यापीठाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पाठबळ राहील

## डॉ. पाटील : विकास आघाडीकडून कुलगुरूंचे स्वागत

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचे स्वागत विद्यापीठ विकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केले. यावेळी विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन आणि विकासात्मक उपक्रमांना आणि सर्वांगीण प्रगतीसाठी आघाडीतर्फे सहकार्य, पाठबळ देऊ, अशी ग्वाही आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांनी दिली.

विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावण्यासाठी सर्व घटकांनी काम करण्याची गरज असल्याचे पदाधिकाऱ्यांनी मत व्यक्त केले. अध्यक्ष डॉ. पाटील यांच्या हस्ते डॉ. कामत आणि डॉ. जाधव यांचे स्वागत केले.

डॉ. कामत यांनी विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याची भूमिका व्यक्त केली. विद्यापीठाला नवी उंची मिळवून देण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले. यावेळी भैया माने, डी. आर. मोरे, मेघा गुळवणी, मंजिरी मोरे, के. एस. चौगले, अनिल कुराडे, प्रताप पाटील, अभिजित कापसे, संजय जाधव, विनोद पंडित उपस्थित होते.

0 9 JUN 2026
लोकमत



श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या कोल्हापूर शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, कुलगुरु प्रा. डॉ. राजनीश कामत आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे निवृत्त सहायक महाव्यवस्थापक अविनाश जोशी उपस्थित होते.

# श्री रवळनाथचा वर्धापनदिन

**कोल्हापूर :** श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या कोल्हापूर शाखेचा वर्धापनदिन तसेच शाखेने १०० कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा पार केल्याबद्दल आयोजित करण्यात आलेला आनंद सोहळा सोमवारी (दि. ८) शिवाजी विद्यापीठात मोठ्या उत्साहात झाला. संस्थापक अध्यक्ष व संचालक एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते.

कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. राजनीश कामत आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे निवृत्त सहायक महाव्यवस्थापक अविनाश जोशी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे व माजी परीक्षा नियंत्रक प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

शाखेचे पहिले शाखा चेअरमन प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडे, प्रा. आर. एस. पाटील (सीए), चेअरमन विजय हरगुडे, डॉ. सतीश घाळी व उमेश मिसाळ, अमृत सुतार, भास्कर सांगावकर, प्रा. डॉ. रवींद्र पोर्लेकर, प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी व पंकज राजे यांचा सत्कार केला. याप्रसंगी संस्थेचे चेअरमन प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, व्हा. चेअरमन डॉ. संजय चौगुले, डॉ. किरण पोतदार, प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील, प्राचार्य डॉ. मनोहर पुजारी, महेश मजती उपस्थित होते. (वा.प्र)

0 9 JUN 2026

जनसंपर्क कक्ष
सकाळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रवळनाथ सोसायटी'ची गरुडझेप कौतुकास्पद

## कुलगुरू डॉ. आर. के. कामत : शंभर कोटी ठेवींचा आनंद सोहळा

कोल्हापूर, ता. ८ : 'ग्राहकाभिमुख सेवा, आर्थिक शिस्त आणि सभासदांच्या पाठबळावर श्री रवळनाथ को-ऑप. हाउसिंग फायनान्स सोसायटीची गरुडझेप कौतुकास्पद आहे,' असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केले.



कोल्हापूर : श्री रवळनाथ को-ऑप. हाउसिंग फायनान्स सोसायटीच्या आनंद सोहळा कार्यक्रमाचा प्रारंभ डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाला. यावेळी उपस्थित अविनाश जोशी, एम. एल. चौगुले, बी. एम. हिर्डेकर आदी.

येथील श्री रवळनाथ को-ऑप. हाउसिंग फायनान्स सोसायटीच्या कोल्हापूर शाखेचा वर्धापन दिन आणि शंभर कोटी ठेवींची संकल्पपूर्तीनिमित्त आज घेतलेल्या आनंद सोहळा कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, तर भारतीय रिझर्व्ह बँकेचे निवृत्त सहायक महाव्यवस्थापक अविनाश जोशी, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. बी. एम. हिर्डेकर प्रमुख उपस्थित होते.

अविनाश जोशी यांनी 'आजचे बँकिंग आणि त्यातील जोखीम' याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडे, प्रा. आर. एस. पाटील, विजय हरगुडे, डॉ. सतीश घाळी, उमेश मिसाळ, अमृत सुतार, भास्कर सांगावकर, प्रा. रवींद्र पोर्लेकर, प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी, पंकज राजे यांचा सत्कार झाला. यावेळी सोसायटीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, उपाध्यक्ष डॉ. संजय चौगुले, संचालक प्राचार्य डॉ. किरण पोतदार, दत्तात्रय पाटील, मनोहर पुजारी, महेश मजती, राजश्री कोले, सीईओ डी. के. मायदेव आदी उपस्थित होते.

0 9 JUN 2026

पुढारी

# दूरशिक्षण केंद्रातर्फे आज एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी मंगळवारी (दि. ९) सकाळी नऊ वाजता प्रवेश प्रक्रिया फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. एमबीए अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन व प्रॉडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एमबीए (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. प्रवेश परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.

0 9 JUN 2026
पुढारी

# विद्यापीठाच्या ६४६ अभ्यासक्रमांचे निकाल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ६४६ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी एमसीए, एमटेक, बीटेक, एमबीए, बीबीए/एमबीए (एकात्मिक), डी फार्मसी, बी फार्मसी आदी २८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा ३८ केंद्रांवर झाल्या. परीक्षेला ९ हजार १४४ विद्यार्थी उपस्थित होते. दि. ८ रोजी एमए (योगा), एमएस्सी (संगणकशास्त्र) आदी चार अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

09 JUN 2026

जनप्रवास

# विद्यापीठाच्या ६४६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिलपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. ८ जूनरोजी विविध २८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ३८ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ९१४४ विद्यार्थी उपस्थित होते. सोमवारी ८ जूनरोजी विविध ४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले असून आजअखेर ६४६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत.